ठळक बातम्या

- विकसित भारत जी राम जी योजनेबाबत काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याची केंद्रीय कृषीमंत्र्यांची टीका

- २०३० पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न ४ हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असा स्टेट बँक ऑफ इंडियाचा अहवाल

- जागतिक आर्थिक मंचच्या परिषदेला आजपासून दावोस इथं प्रारंभ/१००हून अधिक भारतीय कंपन्यांचा सहभाग

- गाझामध्ये शांततेसाठी तयार करण्यात आलेल्या 'बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्याकरिता अमेरिकेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आमंत्रण

आणि

- अजिंठा - वेरुळ चित्रपट महोत्सवातला प्रतिष्ठेचा पद्मपाणि पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार इलिया राजा यांना जाहीर

<><><><><>

विकसित भारत जी राम जी योजनेबाबत काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याची टीका केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यापूर्वीच्या मनरेगा

योजनेतून काँग्रेसने दिलेले हक्क केवळ कागदावर राहिले असं सांगून ते म्हणाले की, काँग्रेसने आपल्या आदर्श आणि कल्पनांशी फारकत घेतली आहे. ....

**- - होल्ड - बाईट- शिवराजसिंग चौहान - -**

मनरेगामधून १० कोटी बांधकामं झाली त्यातली साडेआठ कोटी कामं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारनं केली आहेत असं ते म्हणाले. या सरकारने २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्यावर आणलं असून अनुसूचित जाती जमाती, दिव्यांग, महिला आणि गरिबांना जीरामजीमधे प्राधान्य देण्यात येणार आहे अस त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

२०३० पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न ४ हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलं आहे. यामुळे जागतिक बँकेच्या वर्गवारीनुसार भारत चीन आणि इंडोनेशियाच्या रांगेत जाऊन बसणार आहे. भारताला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनायला साठ वर्षं लागली मात्र २०१४ नंतर ती केवळ सात वर्षांत तीन ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचली आहे. तर २०२५ मधे अर्थव्यवस्थेने चार ट्रिलियन डॉलरचा टप्पा गाठला. पुढल्या दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था

पाच ट्रिलियन डॉलरचं लक्ष्य गाठेल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या या अहवालात म्हटलं आहे. २०१९ मधे भारताचं दरडोई उत्पन्न दोन हजार डॉलरपर्यंत पोहोचलं, २०२६ मधे ते ३ हजार डॉलरपर्यंत पोहोचेल. गेल्या दशकभरात भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जागतिक आर्थिक मंचची बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू होत आहे. या ५६व्या वार्षिक बैठकीला ३ हजारहून अधिक जागतिक नेते उपस्थित राहणार आहेत. या पाच दिवस चालणाऱ्या परिषदेत सहभागी होण्यासाठी १०० हून अधिक भारतीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सरकारी शिष्टमंडळ दावोसमध्ये दाखल झाले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के. राममोहन नायडू यांच्यासह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि झारखंडचे मुख्यमंत्री विविध देशांच्या गुंतवणूकदारांसमोर आपापल्या राज्यांचे सादरीकरण करतील. कर्नाटक, उत्तर प्रदेश, केरळ आणि तेलंगणासह विविध राज्य सरकारांच्या कामाची माहिती देणारे प्रदर्शनात सहभागी होतील.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दावोस परिषदेत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या स्थापना दिनानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. या दलातील महिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांची तत्परता, व्यावसायिकता आणि दृढनिश्चयाबद्दल देश नेहमीच त्यांचा ऋणी राहील असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या स्थापनादिवसाबद्दल समाजमाध्यमांवर शुभेच्छा दिल्या असून दलात सेवा बजावताना हुतात्मा झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांनी श्रद्धांजली अर्पित केली आहे.

**<><><><><>**

८६ वं अखिल भारतीय पीठासीन अधिकारी संमेलन आज उत्तर प्रदेशात लखनौ इथं सुरू होणार आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला उद्घाटन सत्राला संबोधित करतील. या संमेलनादरम्यान, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या विधिमंडळांचे पीठासीन अधिकारी, सचिव आणि विविध

विभागांचे प्रतिनिधी कायदेविषयक प्रक्रिया, संसदीय परंपरा, सभागृहाचं कामकाज, सुशासन आणि इतर मुद्द्यांवर विस्तृत चर्चा आणि विचारमंथन करतील.

<><><><><>

‘लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन’ या विषयावर भारतीय निवडणूक आयोगाने नवी दिल्लीत येत्या बुधवारपासून एका आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन केलं आहे. या विषयावर आयोजित केलेली अशा प्रकारची ही सर्वात मोठी परिषद असून ७० देशांचे सुमारे शंभर प्रतिनिधी तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत सहभागी होणार आहेत. याशिवाय निवडणूक विषयात देशात कार्यरत असलेले तज्ञ  तसंच अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधीही या परिषदेत सहभागी होणार आहेत.

<><><><><>

इस्रायल आणि पॅलेस्टाईन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर गाझामध्ये कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेनं काम करण्याच्या उद्देशानं निर्माण करण्यात आलेल्या गटात अर्थात 'बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केलं आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी या संदर्भात मोदी यांना पत्र

पाठवलं आहे, अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यांनी हे पत्र समाजमाध्यमावर शेअर केलं आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी गाझा पट्टीत इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धविराम कराराच्या दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून या गटाची स्थापना केली आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये, इस्त्रायल आणि हमास या गटानं ट्रम्प यांच्या शांतता योजनेला सहमती दर्शवली होती. मध्य पूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी वीस कलमी आराखडा तयार करण्यात आला आहे.

<><><><><>

पोलंडचे उप प्रधानमंत्री आणि पराराष्ट्र व्यवहार मंत्री रॅडोस्लाव सिकोर्स्की हे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची आज नवी दिल्लीत भेट घेणार आहेत. या भेटीत दोन्ही देशातल्या धोरणात्मक भागीदारीबाबत चर्चा होणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. सिकोर्स्की तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत.

<><><><><>

कुर्दिश नेतृत्वाखालील एस डी एफ अर्थात सिरियन डेमॉक्रॅटिक फोर्सेस या संघटनेसोबतचा संघर्ष थांबल्याचं सिरीयाच्या सरकारने आज जाहीर केलं. जवळपास दोन

आठवड्यांपासून हा संघर्ष सुरू होता, सरकारने संघर्ष थांबवण्यासाठी एसडीएफसोबत एक चौदा कलमी करार केला आहे, यानुसार एसडीएफला सिरियाच्या लष्करात तसंच इतर संस्थांमधे समाविष्ट केलं जाईल असं ठरवण्यात आलं आहे. यामुळे सिरीयन सरकारने पूर्व आणि उत्तरेकडच्या तीन प्रांतांवर पुन्हा एकदा नियंत्रण मिळवलं आहे, असं सिरीयाचे राष्ट्राध्यक्ष अहमद अल शारा यांनी सांगितलं. अमेरिकेचे सिरियामधले विशेष दूत टॉम बराक यांनी या कराराचं स्वागत केलं असून, एकत्रित सिरियासाठी हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान, एसडीएफने अमेरिकन लष्कराच्या मदतीने ईशान्य सिरियामधून इसीसला हद्दपार केलं असून कुर्दिश आणि अरब बहुल भागात सरकार स्थापन केलं.

**<><><><><>**

अकराव्या अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातला प्रतिष्ठेचा पद्मपाणि पुरस्कार यंदा सुप्रसिद्ध संगीतकार इलियाराजा यांना घोषित झाला आहे. २ लाख रुपये स्मृतिचिन्ह, आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरुप आहे. छत्रपती संभाजीनगर इथं येत्या २८ जानेवारीपासून सुरु होणारा हा महोत्सव १

फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. प्रदीर्घ संगीतसेवेसाठी इलियाराजा यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात मालेगाव मनमाड रस्त्यावर काल रात्री खाजगी बस आणि पिक अप व्हॅनची धडक झाल्यामुळे ४ जण ठार तर २० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये बसमधल्या एका प्रवाशाचा तर पिक अप व्हॅनमधल्या तीन प्रवाशांचा समावेश आहे. जखमींना मालेगावमधल्या शासकीय तसंच खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये लातेहार जिल्ह्यात काल लग्नाचं वऱ्हाड घेऊन चाललेली एक बस उलटून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला असून ८० जण जखमी झाले आहेत. त्यातल्या ६० जणांना प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि उरलेल्या २० जणांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. बसचे ब्रेक्स निकामी झाल्यामुळे बसवरचं नियंत्रण सुटल्याची माहिती बसचालकाने दिली.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी एक्स वरच्या आपल्या संदेशात जखमींना योग्य ती वैद्यकीय मदत देण्याच्या सूचना उपजिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

<><><><><>

ओदिशामधल्या स्वातंत्र्यसैनिक पार्बती गिरी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात आजही दाट धुक्याची स्थिती राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. दिल्ली, हरयाणा, चंडीगढ, पंजाब, उत्तर प्रदेश तसंच पश्चिम बंगाल आणि सिक्किमचा हिमालयीन प्रदेश इथं धुक्याचा दाट थर राहील. हिमाचल प्रदेशात उद्यापर्यंत थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

//<><><><><>//